जनसंपर्क अधिकारी
पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेसनोट क्रमांक :- २४८ दिनांक :- ०८/०९/२०२१

## कोकणात जाणा-या गणेश भक्तांना स्थानिक पोलीस स्टेशन व वाहतूक शाखेकडून मिळणार पास.

आगामी गणेशोत्सव कालावधीत कोकणात जाणा-या भाविकांच्या सोयीच्या दृष्टीने आवश्यक त्या सोईसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत महाराष्ट्र शासनाने अधिसुचना पारित केलेल्या आहेत. त्याअनुषंगाने दि ०८/९/२०२१ ते २१/०९/२०२१ या कालावधीकरिता गणेशोत्सव काळात कोकणात जाण्यासाठी व गणेशोत्सवासाठी नागरिकांना स्थानिक पोलीस स्टेशन व वाहतूक शाखेकडून वाहनांना प्रवासाकरिता पास देण्यात येणार आहे. कोकणामध्ये जाण्याकरिता देण्यात आलेली पास परत येण्यासाठी देखील ग्राहय असणार आहे. वाहन पास मिळण्याकरिता भाविकांनी स्थानिक पोलीस स्टेशन किंवा वाहतूक शाखा यांना अर्ज करुन त्यामध्ये वाहन क्रमांक, वाहन प्रवाशी क्षमता, गावी जाण्याचा मार्ग व वाहनातून प्रवास करणा-या प्रवाशांची संख्या व संपुर्ण नांव नमुद करुन अर्ज करावा व तेथून नमुद पास प्राप्त करावी.

----ooo----